महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/१२८२/२०२६-२७ दि:-१४/०७/२०२६

## परिपत्रक

**विषय:- JEE/NEET/MHT-CET परीक्षापूर्व प्रशिक्षण २०२६-२८ करिता अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थांना सूचना.**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या JEE/NEET/MHT-CET परीक्षापूर्व प्रशिक्षण २०२६-२८ करिता विद्यार्थांकडून दि.१७/०४/२०२६ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करून दि.०७/०६/२०२६ रोजी पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते.

सदर प्रशिक्षणाअंतर्गत अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थांचे ऑनलाईन प्रशिक्षण दि.०८/०६/२०२६ रोजी पासून सुरु करण्यात आलेले आहे, तसेच अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थांना इयत्ता ११ वी ला विज्ञान शाखेत प्रवेश घेतले असल्यास त्याबाबतचा पुरावा (बोनाफाईड प्रमाणपत्र) ऑनलाईन सादर करण्याकरिता लिंक दि.१०/०७/२०२६ रोजी पर्यंत महाज्योतीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

तथापि सदर योजनेअंतर्गत अर्ज केलेल्या अनेक विद्यार्थांनी (बोनाफाईड प्रमाणपत्र) ऑनलाईन सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याकरिता महाज्योती कार्यालयाच्या कॉल सेंटरला विनंती केलेली आहे. त्यामुळे विद्यार्थांनी या कार्यालयास केलेली विनंती विचारात घेता (बोनाफाईड प्रमाणपत्र) ऑनलाईन सादर करण्यासाठी दि.२०/०७/२०२६ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

जे विद्यार्थी इयत्ता ११ वी ला विज्ञान शाखेत प्रवेश घेतल्याचा पुरावा (बोनाफाईड प्रमाणपत्र) सादर करतील व प्रशिक्षणाकरिता नियमितपणे उपस्थित असणार केवळ अशाच विद्यार्थाची Tab वितरणाकरिता निवड करण्यात येईल. मात्र प्रशिक्षणाचे लाभ सर्व विद्यार्थांना देण्यात येईल, सर्व संबंधित विद्यार्थांची याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**